आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
७ एप्रिल २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- स्थलांतरित कामगारांना दिल्या जाणाऱ्या पाच किलोच्या FTL एलपीजी सिलेंडरचं वाटप दुप्पट करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- मुंबईत मेट्रो ९ मार्गिकेवरच्या दहिसर पूर्व ते काशिगाव या टप्प्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

- महावितरणची आर्थिक पुनर्रचना करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**आणि**

- आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत ललित सेहरावत अंतिम फेरीत दाखल

**<><><><><><>**

स्थलांतरित कामगारांना दिल्या जाणाऱ्या पाच किलोच्या FTL एलपीजी सिलेंडरचं वाटप दुप्पट करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव डॉ. नीरज मित्तल यांनी याबाबत सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहिले आहे.

FTL अंतर्गत दिलं जाणारे पाच किलोचे एलपीजी सिलिंडर स्थलांतरित कामगारांना देण्यासाठी राज्यांच्या अन्न आणि नागरी पुरवठा विभागांना उपलब्ध करून दिले जातील. यासाठी तेल विपणन कंपन्यांचे सहकार्य घेतलं जाईल, असं या पत्रात नमूद केलं आहे. वाढीव वाटप हे स्थलांतरित कामगारांना दिल्या जाणाऱ्या सिलिंडरच्या सरासरी दैनंदिन पुरवठ्यावर आधारित असेल. ही सुधारित मर्यादा मार्चमध्ये जाहीर केलेल्या २० टक्क्यांपेक्षा जास्त असल्याचं पेट्रोलियम मंत्रालयाने सांगितलं. २३ मार्चपासून आतापर्यंत सुमारे सहा लाख ७५ हजार इतके पाच किलोच्या एलपीजी सिलिंडरची विक्री झाली आहे.

<><><><><>

मुंबईत मेट्रो ९ या नव्या मार्गिकेवरच्या दहिसर पूर्व ते काशिगाव या टप्प्याचं लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज झालं. यामुळे मुंबईत कार्यरत असणाऱ्या मेट्रोमार्गानं १०० किलोमीटरचा टप्पा ओलांडला आहे. विविध विकासकामांमुळे मुंबईतली वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. मेट्रो परिचालनामध्ये दिल्लीपाठोपाठ मुंबईचा क्रमांक लागतो, परंतु लवकरच मुंबई अव्वल स्थान पटकावेल, असं मुख्यमंत्री म्हणाले. दहिसर पूर्व ते काशिगाव या सुमारे साडे चार किलोमीटर मार्गिकेवर पांडुरंगवाडी आणि मिरागाव या स्थानकांसह एकूण ४ स्थानकं असणार आहेत. यामुळे गुंदवलीपासून मीरा भाईंदरपर्यंतचा थेट प्रवास आता मेट्रोनं करता येणार आहे. ठाणे ते बोरीवली भुयारी मार्ग प्रकल्पासाठी खोदकामाचा प्रारंभही आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला. या दुहेरी बोगद्याचं खोदकाम टीबीएमच्या साहाय्यानं केलं जाणार आहे. सध्या या प्रवासाला लागणारा दीड तासाचा वेळ या बोगद्यामुळे पंधरा मिनिटांवर येणार आहे. हा बोगदा २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. चेंबूर इथलं आचार्य उद्यान ते महाराष्ट्र नगर, मंडाले या सुमारे साडे पाच किलोमीटर अंतराच्या मेट्रो दोन ब या मार्गिकेचंही लोकार्पण आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होत आहे. या दोन्ही मार्गिकांवर उद्यापासून नियमित सेवा सुरु होईल.

<><><><><>

महावितरण अर्थात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची आर्थिक पुनर्रचना करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला. महावितरण कंपनी भांडवली बाजारात सूचिबद्ध करण्याचा तसंच शासन हमी असलेल्या ३२ हजार ६७९ कोटी रुपयांच्या कर्जासाठी भांडवली बाजारात सरकारी रोखे आणण्याचा निर्णयही आजच्या बैठकीत घेण्यात आला. आपत्ती

व्यवस्थापनात खासगी भांडवलाच्या मदतीने वित्तपुरवठा उभारण्यासाठी महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबवायलाही मंत्रिमंडळान मंजुरी दिली. यासाठी जागतिक बँकेकडून १६५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. आपत्तीग्रस्तांन गृहकर्जात तसंच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना कर्जात सवलत आणि विमा सुरक्षा उपलब्ध होणार आहे. त्याशिवाय राज्यात रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरचं रुपांतर आता कंपनीत करण्यात येईल. त्यामुळे रस्ते माहिती प्रणाली, नगररचना, जलयुक्त शिवारसह नियोजन विभागातल्या विविध क्षेत्रांच्या अभ्यासाला गती मिळणार आहे. भूस्थानिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासनात गतिमानतला आणण्यासाठी महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर स्थापन करण्यात येणार आहे.

**<><><><><><>**

आज जागतिक आरोग्य दिवस साजरा केला जात आहे. उत्तम आरोग्यासाठी चांगल्या सवयी लागाव्यात याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशानं हा दिवस साजरा केला जातो. विज्ञानाच्या सोबतीनं **आरोग्यासाठी एकत्र येऊ या** अशी यावर्षीची संकल्पना आहे.

दरम्यान, आजच्या जागतिक आरोग्य दिवसानिमित्तानं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज सेवेसाठी आणि निरोगी जगासाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या सर्वांचे आभार समाज माध्यमावरील संदेशातून मानले आहेत. आरोग्य व्यवस्थांना अधिक बळकट करण्यासाठी आणि प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणाला प्राधान्य देण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन प्रधानमंत्र्यांनी केलं. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याणमंत्री जगत प्रकाश नड्डा यांनीही डॉक्टर, नर्स आणि आरोग्य सेवेत कार्यरत असलेल्या सर्वांचे आभार मानले आहेत.

**<><><><><><>**

मानवी शरीरासाठी योग ही एक समग्र जीवनशैली असून यातून मानसिक शांती, शारीरिक सुदृढता आणि सकारात्मक जीवनदृष्टी मिळते, असं प्रतिपादन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं. बुलढाणा जिल्ह्यात लोणार सरोवराच्या काठावरील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात, आयोजित केलेल्या योग महोत्सवाचं उद्घाटन जाधव यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर उलटगणना उपक्रमाचा भाग म्हणून हा महोत्सव होत आहे. यावेळी एकाच वेळी सहा हजार लोकांनी त्रिकोणासन हे आसन करुन एका नव्या विक्रमाची एशियन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद केली.

<><><><><><>

किर्गिझीस्तान मध्ये बिशकेक इथे सुरु असलेल्या आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत पुरुषांच्या ग्रीकोरोमन प्रकारातल्या ५५ किलो वजनी गटात भारताच्या ललित सेहरावतने चीनच्या ह्युईंग शी याला हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. आता सुवर्णपदासाठी ललितची लढत गेल्या वर्षीचा कांस्यपदक विजेता असलेल्या उझबेकिस्तानचा इख्तियार बोटिरोव्ह याच्याशी होणार आहे.

परंतु याच प्रकारात ७७ किलो वजनी गटात भारताचा अमन आणि ८७ किलो वजनी गटात सुनील कुमार यांना त्यांच्या उपांत्य फेरीत पराभव पत्करावा लागल्यामुळे आता त्या गटात भारताचं रौप्यपदक हुकलं आहे. आता कांस्यपदकासाठी अमनचा सामना दक्षिण कोरियाच्या येओन्ग हुंग नोह बरोबर होईल. याशिवाय भारताचे विविध वजनी गटातले कुस्तीगीर साहीन, सचिन सेहरावत, अनिल, प्रिन्स आणि नितेश आज त्यांचे सामने खेळणार आहेत.

<><><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना राजस्थान रॉयल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात होणार आहे. गुवाहाटी इथे बसरपारा मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

**<><><><><>**

स्पेनमधल्या ग्रॅनाडा इथे होत असलेल्या आय एस एस एफ रायफल आणि पिस्तुल जागतिक चषक स्पर्धेत आज भारतीय नेमबाजांच्या सामन्यांना सुरुवात होत आहे. पिस्तुल मिश्र प्रकारात पलक गुलिया आणि मुकेश नेलावल्ली तसंच सैन्यम आणि उज्ज्वल मलिक या जोड्या सहभागी होत आहेत. १० मीटर एयर रायफल मिश्र प्रकारात सोनम मस्कर-गजानन खंडागळे आणि श्रुति- अर्शदीप सिंह भारताचं प्रतिनिधित्व करतील.

**<><><><><>**

अमरावती–अकोला महामार्गावर काल रात्री उशीरा झालेल्या रस्ते अपघातात चौघेजण ठार तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बडनेरा इथं राहणारे सातजण गाडीतून येत असताना समोरून येणाऱ्या ट्रकनं त्यांना धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की गाडीतल्या चौघांचा जागीच मृत्यू झाला तर तिघं जण गंभीर जखमी झाले असून त्यातील एकाची प्रकृती गंभीर आहे.

**<><><><><>**

नाशिकच्या दिंडोरी तालुक्यात गाडी विहिरीत पडून झालेल्या अपघाताच्या सखोल तपासासाठी चौकशी समिती स्थापना केल्याचं जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी सांगितलं. या समितीला सात दिवसात तपास अहवाल देण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. सिन्नर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अभिजित कदम यांच्या अध्यक्षतेखाली ही चौकशी समिती काम करणार आहे. विहिरीत गाडी पडून झालेल्या अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला होता.

**<><><><><>**

नागपूर शहरात सी ए मार्ग परिसरात आज जिवंत स्फोटकांचा साठा सापडल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे. मेट्रो स्थानकाच्या अगदी जवळ असलेल्या एका घराच्या परिसरात आज सकाळी पोलिसांना एका बॅगेत १५ जिलेटीन कांड्या, ५८ डिटोनेटर आणि ८ कनेक्टर आढळून आले.

**//<><><><><><>//**